# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांकः26.04.2024 वारःशुक्रवार

---

1. लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातल्या आठ मतदारसंघांत आज मतदान; 204 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात
2. चौथ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपली; आज होणार छाननी
3. लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्याची अधिसूचना आज जाहीर होणार आणि
4. लोकसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचा शपथनामा; तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा वचननामा जाहीर

**<u>मतदान</u>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्यात आज 13 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातल्या 88 लोकसभा मतदारसंघात मतदान होत आहे. यामध्ये राज्यातल्या अमरावती, अकोला, वर्धा, यवतमाळ-वाशिम, नांदेड, परभणी, हिंगोली, आणि बुलडाणा, या मतदारसंघांचा समावेश आहे. या सर्व मतदारसंघामधे मिळून 204 उमेदवार नशीब आजमावत आहेत. अमरावती, हिंगोली आणि परभणीत 30 पेक्षा अधिक उमेदवार रिंगणात आहेत.

विद्यमान खासदार प्रतापराव जाधव, नवनीत राणा, रामदास तडस, प्रतापराव पाटील-चिखलीकर, संजय जाधव यांच्यासह प्रकाश आंबेडकर, महादेव जानकर या मतदारसंघातून निवडणूक रिंगणात आहे. आज मतदान होत असलेल्या राज्यातल्या आठ मतदारसंघात एकंदर 16 हजार 589 मतदान केंद्र असून एक कोटी 49 लाखांपेक्षा जास्त मतदारांची नोंदणी झाली आहे.

**<u>अर्जदाखल</u>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत काल संपली. यामध्ये पुणे, शिरूर, मावळ, नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, औरंगाबाद, अहमदनगर, शिर्डी आणि बीड या मतदारसंघांमध्ये 13 मे रोजी मतदान होणार आहे. राज्यातील या 11 लोकसभा मतदारसंघात 447 उमेदवारांचे 618 अर्ज दाखल झाले आहेत. आज अर्जाची छाननी होणार आहे. आणि येत्या सोमवार पर्यंत अर्ज मागे घेता येतील. दरम्यान अखेरच्या दिवशी विविध पक्षांच्या उमेदवारांनी शक्ति प्रदर्शन करत आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.

महायुतीचे पुण्यातील उमेदवार मुरलीधर मोहोळ तसंच शिरूर लोकसभा मतदार संघातले महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी काल शक्तीप्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. मोहोळ यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आयोजित केलेल्या पदयात्रेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सहभाग घेतला. महाआघाडीकडे विकासाची दृष्टी नसून, त्यांची अवस्था दिशाहिन झाली आहे. त्यांच्याकडे नेता नाही, नीती नाही आणि नियत ही नाही अशी टीका फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना केली. शिवाजीराव आढळराव पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत अर्ज दाखल केला.

नंदुरबार लोकसभा मतदार संघातील कॉंग्रेसचे उमेदवार गोवाल पाडवी यांनी काल शक्तीप्रदर्शनाद्वारे पुन्हा आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. 22 तारखेला अवघ्या पाच कार्यकर्त्यांसह उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर काल महाविकास आघाडीच्या घटकपक्षांसोबत मिरवणूकीने वाजत गाजत त्यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. जळगाव आणि रावेरच्या महायुतीच्या उमेदवार रक्षा खडसे आणि स्मिता वाघ यांनीही काल आपापले उमेदवारी अर्ज दाखल केले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थितीत होते.

**<u>अधिसूचना</u>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्याची अधिसूचना आज जारी होणार आहे. यात राज्यातल्या 13 मतदारसंघांचा समावेश आहे. त्यात मुंबईतले सर्व 6 मतदारसंघ, ठाणे, कल्याण, भिवंडी, पालघर, नाशिक, दिंडोरी आणि धुळे या लोकसभा मतदारसंघांमध्ये 20 मे रोजी मतदान होणार आहे. या सर्व ठिकाणी आजपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात होईल. उमेदवारांना 3 मेपर्यंत अर्ज दाखल करता येतील. 4 मे रोजी अर्जांची छाननी होईल, तर 6 मे ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची मुदत असेल. दरम्यान काँग्रेसनं उत्तर मध्य मुंबईतून वर्षा गायकवाड यांची उमेदवारी काल जाहीर केली.

**<u>शरद पवार जाहीरनामा</u>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा जाहीरनामा पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते काल प्रकाशित करण्यात आला. खासदार वंदना चव्हाण, ज्येष्ठ नेते जयंत पाटील यावेळी उपस्थित होते. शपथनामा या नावानं प्रकाशित झालेल्या या जाहीरनाम्यात स्वयंपाकाच्या गॅसचा दर पाचशे रुपयांपर्यंत करणे, सरकारी नोकऱ्यांमधील वीस लाख रिक्त जागा भरणे, वस्तू आणि सेवा कर प्रणालीत राज्याचा सहभाग वाढवून केंद्राचा हस्तक्षेप मर्यादित करणे, शेतकऱ्यासाठी कर्जमाफी, आयात निर्यात धोरण ठरविण्यासाठी आयोग स्थापन करणे, सत्तेत आल्यानंतर जातनिहाय जनगणना, महिला आरक्षण, कृषी उत्पादन आणि शैक्षणिक साधने यावर शून्य टक्के जी एस टी आदी गोष्टींचा समावेश आहे. एक देश एक निवडणूक या संकल्पनेला पक्षाचा विरोध असल्याचंही यात स्पष्ट केलं आहे. नागरिकत्व कायदा, राष्ट्रीय नागरिक नोंदणी, दहशतवादाविरोधातला युएपीए कायदा इत्यादी कायद्यांचा फेर आढावा घेऊन त्यात बदल करण्याचं आश्वासन पक्षानं जाहीरनाम्यातून दिलं आहे.

**<u>जाहीरनामा-मुंबई</u>**

लोकसभा निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा वचननामा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल मुंबईत जाहीर केला. किमान 5 जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवू, शेतकऱ्यांना कर्जमुक्त करु, पीकविम्याचे निकष बदलू, 'विकेल ते पिकेल' या योजनेचं पुनरुज्जीवन करु, जिल्हा रुग्णालयं अद्ययावत करु, रोजगाराच्या संधी वाढवणे इत्यादी घोषणा या वचननाम्यात केल्या आहेत. देशाची आर्थिक राजधानी म्हणून मुंबईचं स्थान पुन्हा मिळवून देऊ, असंही ते म्हणाले. पर्यावरणाला घातक प्रकल्पांना आपला विरोध कायम राहील, असं त्यांनी सांगितलं. शेतीसाठीच्या वस्तूंवर जीएसटी हटवणं, आरक्षणाची मर्यादा 50 टक्क्याच्या पुढे नेण्यालाही उद्धव ठाकरे यांनी पाठिंबा दिला आहे.

**<u>लग्न समारंभ आणि मतदान - वाशिम</u>**

वाशिम लोकसभा मतदार संघासाठी आज मतदान होत आहे. आज विवाहाची मोठी तिथी असल्याने या मतदार संघात अडीचशेहून जास्त लग्न समारंभ नियोजित आहेत. या समारंभांचा फटका मतदानाला बसू नये यासाठी लग्नकार्याबरोबरच लोकांनी लोकशाहीच्या उत्सवातही सहभागी होऊन आपला मतदानाचा हक्क बजावावा असं आवाहन वाशिमच्या जिल्हाधिकारी एस भुवनेश्वरी यांनी नागरिकांना केलं आहे त्या म्हणाल्या.....

**<u>व्यवस्था-वाशिम</u>**

वाशिम जिल्ह्यात सध्या 38 ते 40 अंश सेल्सिअस तापमान आहे, त्यामुळे मतदारांना उन्हाचा त्रास होऊ नये यासाठी ठिकठिकाणी मतदान केंद्रांवर विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. अकोला लोकसभा मतदारसंघातील मालेगाव तालुक्यातील शिरपूर गावातल्या जिल्हा परिषद शाळेतल्या मतदान केंद्रासमोर मतदारांना सावलीसाठी कापडी मंडपाची व्यवस्था केली आहे.

**<u>बुलडाणा व्यवस्था</u>**

इबुलडाणा जिल्ह्यात मतदान केंद्रावर मतदारांना रांगेत उभे राहावं लागू नये यासाठी मतदान केंद्रालगत स्वतंत्र कक्षाची व्यवस्था केली आहे.

**<u>सुरक्षायंत्रणा-नांदेड</u>**

नांदेड जिल्ह्यात 3 हजार 41 मतदान केंद्रे आहेत. त्यातील संवेदनशील केंद्रांसह 50 टक्के मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग यंत्रणा बसविली आहे.

**<u>एएफएमसी</u>**

सशस्त्र सेना वैद्यकीय महाविद्यालय अर्थात एएफएमसीच्या 58 व्या तुकडीचा दीक्षांत संचलन समारंभ काल झाला. 140 विद्यार्थ्यांनी यात शानदार संचलन केलं. यामध्ये पाच परदेशी विद्यार्थी तसंच 25 विद्यार्थिनींचा सहभाग होता. एएफएमसीचे महासंचालक लेफ्टनंट जनरल दलजितसिंह यांनी संचलनाची पाहणी केली आणि मानवंदना स्वीकारली.

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासात विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून कोकणात हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.